**बातमी क्रमांक - १**

जळगाव दि. ४ (प्रतिनिधी) - नेट परीक्षा उत्तीर्ण करून कॅटेगरी १,२,३ नुसार पीएचडी प्रवेशासाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना पीएचडी प्रवेशासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पेट - २०२४ मध्ये ऑनलाईन अर्ज ३० दिवसात करण्याबाबत विद्यापीठाने कळविले आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने नेट परीक्षा पात्र विद्यार्थ्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) च्या दिनांक २८ मार्च २०२४ च्या पत्रानुसार पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने आपल्या परीपत्रक क्र. ५८/२०२४ नुसार, Admission मथळ्याखाली विविध सूचना जाहीर केल्या आहेत.

या परीपत्रकातील मुद्दा क्र. ४.१.३ नुसार, एप्रिल २०२५ मध्ये NET परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रवेशासाठी UGC पात्र मानत आहे. अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील पीएच.डी. विभागात 'PET-2024' या लिंकवर क्लिक करून ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करताना आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावीत. NET परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, विद्यार्थ्यांनी आपला अर्ज डाउनलोड करून हार्डकॉपी स्वरूपात सर्व संबंधित कागदपत्रांसह विद्यापीठाच्या संशोधन विभागात सादर करणे बंधनकारक आहे.

ही प्रक्रिया विद्यापीठाच्या दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ रोजी निर्गमित पत्र क्र. KBCNMU/11/PET-2024/Entrance Exam./1469/2024 नुसार राबविण्यात येणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने सर्व पात्र NET उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वेळेत अर्ज करतअधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट देण्याचे कळविले आहे

**बातमी क्रमांक - २**

जळगाव दि. ४ (प्रतिनिधी) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे प्रमाणपत्र ते पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस १८ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे प्रमाणपत्र ते पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या विविध अभ्यासक्रम राबवले जातात. ज्या विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयात जाऊन उच्च शिक्षण घेणे शक्य नाही, जे विद्यार्थी नोकरी-व्यवसाय करत आहेत, गृहिणी आहेत, स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत, तळागाळातील व्यक्ती ज्या शिक्षणापासून वंचित आहेत तसेच नोकरी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे शिक्षण अपूर्ण राहिले असेल अशा सर्वांना बाहेरून शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विभागाद्वारे एम.ए. मराठी, हिन्दी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र,

समाजशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिकशास्त्र, मानसशास्र, शिक्षणशास्र आणि एम. कॉम. असे ११ पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. सर्व ११ पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस दि. १८ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सर्व शिक्षणक्रमांची संरचना आणि अंमलबजावणी प्रक्रिया नवीन शैक्षणिक धोरण-2020 नुसार सत्र पद्धतीने विद्यापीठाचे कुलगुरू व्ही एल माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. आजीवन विभाग हा विद्यापीठातील वेगळेपण जोपासणारा विभाग आहे. आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी या विभागाद्वारे आपले पदव्युत्तर शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून विद्यापीठाचे नावलौकिक जोपासले आहे.

सर्व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम हे नोकरी/व्यवसाय करून आपण पूर्ण करू शकता. पाठ्यक्रम आणि पदवी विद्यापीठाचीच आहे. सत्र (सेमिस्टर) पद्धतीद्वारा हे शिक्षणक्रम राबविले जातात. जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यात परीक्षा केंद्रांची सुविधा उपलब्ध आहे. प्रवेश ते पदवी प्रदान अंतर्गत ऑनलाईन अंमलबजवाणी प्रक्रिया असल्यामुळे उच्च शिक्षण पूर्ण करण्याची घरबसल्या उत्तम संधी आहे.

सर्व विषयांचे स्वयं अध्ययन साहित्य ई-स्वरुपात उपलब्ध आहे. सर्व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम हे विविध स्पर्धा परीक्षा, पीएच. डी, नोकरीसाठी उपयुक्त आहे. रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी संमंत्रण सत्रांचे हायब्रीड (hybrid) पद्धतीने आयोजन केले जाते. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन आपले उच्च शिक्षण करण्याचे स्वप्न पूर्ण करावे असे आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक, प्रा. डॉ. आशुतोष पाटील यांनी आवाहन केले आहे.

**बातमी क्रमांक - ३**

जळगाव दि. ४ (प्रतिनिधी) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी कार्यक्रमांतर्गत गुरू-शिष्य संबंधावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे उपस्थित होते.

या चर्चासत्रात पूर्वापार चालत आलेली गुरू-शिष्य परंपरा ते आजच्या काळातील शिक्षक-विद्यार्थी संबंधावर सखोल चर्चा घडवून आणली गेली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी गुरू-शिष्य परंपरेचे स्पष्टीकरण देताना गुरू-शिष्य हे नाते शुध्दतेच्या मार्गातून जाणारे असावे. शिष्याची गुरूप्रती असलेली श्रध्दा ही स्वार्थाच्या पलीकडील असावी. यासोबतच शिक्षकांनी देखील विद्यार्थ्यांमध्ये जात-पात, लिंग, वर्ण असा कुठलाही भेदाभेद न करता निस्वार्थ भावनेने समान ममत्वाने शिक्षण द्यावे. तसेच गुरू हा संकुचित विचारसरणीचा नसावा, तर तो खुल्या विचारसरणीचा असावा असे विचार व्यक्त करत अनेक गुरु शिष्य परंपरेचे अनेक उदाहरणे दिले

या चर्चासत्रात प्रशाळेतील प्रा. डॉ. दिपक खरात, कृष्णा संदानशिव, प्रतिभा गलवाडे, भारती सोनवणे,

स्नेहा गायकवाड तसेच संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, महेश सुर्यवंशी यांनी सहभाग घेऊन सखोल चर्चा आणि चिंतन घडवून आणले. या चर्चासत्रासाठी भाषा अभ्यास प्रशाळेतील मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयाचे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रतिभा गलवाडे यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ०४ ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी

करीता